# जाहिरनामा

## उपविभागीय दंडाधिकारी एरंडोल भाग यांचे कार्यालय एरंडोल, जिल्हा जळगाव

### पोलिस पाटील पदभरतीसाठी जाहिरात 2018

जाहिरात क्रमांक 01/2018

जळगाव जिल्हयातील एरंडोल उपविभागातील उपविभागीय दंडाधिकारी, एरंडोल भाग कार्यालयांतर्गत गावांत पोलिस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच www.jalgaonexam.com या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| **ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात** | **ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत** |
|---|---|
| दिनांक 05/05/2018 रोजी सकाळी 12.00 पासून | दिनांक 16/05/2018 सायंकाळी 05.30 पर्यंत |

सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात www.jalgaonexam.com या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहित चलनाद्वारे भरलेले परिक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व गाव निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी, एरंडोल भाग यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

उपविभागीय अधिकारी एरंडोल भाग एरंडोल यांचे आस्थापनेवरील पोलीस पाटील रिक्त पदाचे तपशील अनुशेष सह पुढील प्रमाणे

| अ.क्र. | तालुका | गावाचे नाव | आरक्षण प्रवर्ग | समांतर महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | पारोळा | उडणीदिगर | अनुसूचित जाती | नाही |
| 2 | धरणगाव | बाभळे बु. | अनुसूचित जाती | **महिला** |
| 3 | धरणगाव | सार्वे खु. | अनुसूचित जाती | नाही |
| 4 | धरणगाव | खपाट | अनुसूचित जाती | नाही |
| 5 | धरणगाव | खर्दे बु. | अनुसूचित जाती | नाही |
| 6 | पारोळा | टेहू | अनुसूचित जाती | नाही |
| 7 | पारोळा | महाळपूर | अनुसूचित जाती | नाही |
| 8 | एरंडोल | बांभोरी खु. | अनुसूचित जाती | नाही |
| 9 | धरणगाव | पिंपळे खु. | अनुसूचित जाती | नाही |
| 10 | धरणगाव | निमखेडा | अनुसूचित जाती | **महिला** |
| 11 | एरंडोल | ब्राम्हणे | अनुसूचित जाती | **महिला** |
| 12 | पारोळा | बोळे | अनुसूचित जाती | **महिला** |
| 13 | धरणगाव | वाघळूद बु. | अनुसूचित जाती | नाही |
| 14 | एरंडोल | पळासदळ | अनुसूचित जमाती | नाही |
| 15 | पारोळा | पुनगाव | अनुसूचित जमाती | नाही |
| 16 | पारोळा | तांबोळे | अनुसूचित जमाती | **महिला** |
| 17* | पारोळा | उत्रड | अनुसूचित जमाती | नाही |
| 18 | पारोळा | जामदे | अनुसूचित जमाती | नाही |
| 19 | एरंडोल | गालापुर | अनुसूचित जमाती | नाही |
| 20 | धरणगाव | फुलपाट | अनुसूचित जमाती | **महिला** |
| 21 | पारोळा | सोके | अनुसूचित जमाती | नाही |
| 22 | धरणगाव | चांदसर बु. | अनुसूचित जमाती | **महिला** |
| 23 | धरणगाव | कवठळ | विशेष मागास प्रवर्ग | नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 24 | धरणगाव | नांदेड | विशेष मागास प्रवर्ग | **महिला** |
| 25 | पारोळा | टिटवी तांडा | विमुक्त जमाती (अ) | **महिला** |
| 26 | पारोळा | दळवेल | विमुक्त जमाती (अ) | नाही |
| 27 | धरणगाव | सोनवद बु. | भटक्या जमाती (ब) | नाही |
| 28 | पारोळा | वाघरे | भटक्या जमाती (क) | नाही |
| 29 | धरणगाव | भोद बु. | भटक्या जमाती (क) | **महिला** |
| 30 | पारोळा | विटनेर | भटक्या जमाती (क) | नाही |
| 31 | पारोळा | विटवे | भटक्या जमाती (क) | **महिला** |
| 32 | धरणगाव | बांभोरी बु. | भटक्या जमाती (क) | नाही |
| 33 | धरणगाव | टहाकळी | भटक्या जमाती (ड) | नाही |
| 34 | धरणगाव | चिंचपूरे बु. | इतर मागास प्रवर्ग | नाही |
| 35 | पारोळा | वाघरी | इतर मागास प्रवर्ग | नाही |
| 36 | पारोळा | इंधवे | इतर मागास प्रवर्ग | **महिला** |
| 37 | एरंडोल | पिंप्री सिम | सर्व साधारण | नाही |
| 38 | एरंडोल | पातरखेडे | सर्व साधारण | नाही |
| 39 | पारोळा | दगडी प्र. अ | सर्व साधारण | नाही |
| 40 | धरणगाव | मुसई खु. | सर्व साधारण | नाही |
| 41 | पारोळा | हिरापुर | सर्व साधारण | **महिला** |
| 42 | पारोळा | पळासखेडे खु. | सर्व साधारण | नाही |
| 43 | पारोळा | बोदर्डे | सर्व साधारण | नाही |
| 44 | एरंडोल | फरकांडे | सर्व साधारण | नाही |
| 45 | पारोळा | आडगाव | सर्व साधारण | **महिला** |
| 46 | पारोळा | पळासखेडे बु. | सर्व साधारण | नाही |
| 47 | पारोळा | तरवाडे खु. | सर्व साधारण | **महिला** |
| 48 | पारोळा | ढोली | सर्व साधारण | नाही |
| 49 | पारोळा | बाभळेनाग | सर्व साधारण | **महिला** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 50 | पारोळा | करमाड बु. | सर्व साधारण | नाही |
| 51 | धरणगाव | आनोरे | सर्व साधारण | नाही |
| 52 | पारोळा | करंजी बु. | सर्व साधारण | **महिला** |

## किमान आवश्यक अर्हता

खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता 16/05/2018 या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ .क्र. | संवर्ग (पदनाम) | किमान आवश्यक अर्हता |
|---|---|---|
| 1 | पोलिस पाटील | 1. उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षेत (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा.<br>2. **अ)** वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे दिनांक 16/05/2018 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.<br>**ब)** उमेदवाराचे वय दिनांक 16/05/2018 रोजी **25** वर्षांपेक्षा कमी नसावे व **45** वर्षां पेक्षा जास्त नसावे.<br>**क)** पोलिस पाटील पदाकरीता वयोमर्यादा शिथिलक्षम नाहीत.<br>3. उमेदवार संबंधित गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असावा.<br>4. उमेदवार शारिरीकदृष्ट्या सक्षम असावा व उमेदवाराचे चारित्र्य निष्कलंक असणे आवश्यक.<br>5. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील लहान कुटुंबाची अर्हता धारण करणे आवश्यक राहील.<br>6. मागासप्रवर्गासाठी आरक्षित पदाकरीता त्याप्रवर्गाचे सक्षम अधिका-याने निर्गमीत केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>7. मागासप्रवर्गातील उमेदवार (वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व.) यांना सन 2018-19 या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन-क्रिमिलेयर) प्रमाणपत्र आवश्यक राहील.<br>8. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे अनिवार्य आहे. राखीव महिला पदांसाठी अर्ज सादर करणाऱ्या महिला उमेदवारांना सन 2018-19 या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन-क्रिमिलेयर) प्रमाणपत्र आवश्यक राहील. |

**परिक्षेचे स्वरुप**

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | परिक्षेसाठी गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | तोंडी परिक्षा. (मुलाखत) | एकूण गुण |
| 1 | पोलिस पाटील | 80 | 20 | 100 |

लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे राहील.

1. पोलिस पाटील पदाची लेखी परीक्षा **80** गुणांची असेल**.** प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहिल.
2. लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
3. लेखी परीक्षा इयत्ता दहावी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. यात सामान्यज्ञान, गणित, स्थानिक परिसराची माहिती व चालू घडामोडी इत्यादी विषयांचा समावेश असेल.
4. लेखी परीक्षेत एकूण 80 गुणांपैकी किमान 36 गुण (45% टक्के) प्राप्त केलेल्या उमेदवारांमधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील उमेदवारांची तोंडी परिक्षा घेण्यात येईल.
5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-2010/209/प्र.क्र. 66/10/13-अ, दि. 19/06/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परीक्षा घेतेवेळी उत्तरपत्रिकेवर उत्तरे लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळ्या शाईच्या बॉलपेनचा वापर करावा लागेल.
6. लेखी परिक्षेत मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारास, पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील. तोंडी परिक्षेत अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतिम निवडीस अपात्र ठरेल. मात्र एखाद्या उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा उमेदवार पोलीस पाटील पदावरील निवडीकरिता पात्र राहील.

**निवडीसाठी कार्यपद्धती, अटी, शर्ती.**

1. प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा तोंडी परीक्षा / अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
2. लेखी परिक्षा,तोंडी परीक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमा बाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
3. लेखीपरीक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांचे जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी करण्याकरिता अंतरिम स्वरुपात यादि जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिद्ध होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अशा उमेदवारांचे मागीतलेले सामाजिक आणि/किंवा समांतर आरक्षण अथवा प्रक्रिया शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

4. उमेदवार शारिरीक दृष्ट्या सक्षम असल्या बाबतचे अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल व उमेदवाराची पात्रता वैद्यकीय तपासणीअंतीच निश्चित करण्यात येईल.
5. उमेदवाराचे चारित्र्य निष्कलंक असल्या बाबतचे संबांधित पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.
6. उमेदवार कोणत्याही राजकिय पक्षाशी संबांधित नसावा. त्या बाबतचे रुपये 100 च्या स्टँप पेपरवरील प्रतिज्ञापत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.
7. पोलिस पाटील पदावरील नियुक्तिकरीता मृत / सेवानिवृत्त पोलिस पाटलाच्या वारसाने अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलिस पाटलाच्या वारसासह दोन किंवा अधिक उमेदवारांना **समान गुण** मिळाल्यास पोलिस पाटलाच्या वारसाची निवड करण्यात प्राधान्य देण्यात येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्राम पोलिस पाटील (सेवा प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार सर्व अटी व शर्ती पूर्ण करीत असला पाहिजे. तसेच तो दिनांक 16/10/2008 च्या शासन निर्णयानुसार त्या गावासाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक / समांतर आरक्षणाचा असला पाहिजे.
8. उमेदवार संबंधित गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
9. उमेदवार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक/कायमचा रहिवासी असु शकतो सबब उमेदवाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातुन केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.
10. प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषांनुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करताना उमेदवाराने आरक्षण तपासूनच अर्ज करावा.
11. संपुर्ण जळगाव जिल्हयात सर्व उपविभागांसाठी एकाच दिवशी एकाच वेळी परीक्षा घेण्यात येईल.
12. संपुर्ण भरती प्रक्रिया गावनिहाय होणार असून कोणत्याही दोन गावांच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.
13. पोलिस पाटील हे पद वर्गीकृत नाही.
14. पोलिस पाटीलांना क्षेत्रिय स्तरावर (Field Work) काम करावे लागते त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारिरीक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगांसाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.
15. पोलिस पाटील हे पद एका गावात एकच असते. त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजीसैनिक, खेळाडु यासारखी समांतर आरक्षणे लागू नाही.
16. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि. 12/12/2011 मधील तरतुदीनुसार याचिका क्र. 2136/2011 व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 06 महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.
17. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, 2001 ( सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे दि. 31 मार्च, 2019 पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमिलेअरचे तत्व अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गांना लागू राहील.
18. शासन, महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000 /प्र.क्र.415/का.2 दि. 25/05/2001 आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी सन 2018-2019 या कालावधीकरीता वैध असलेले (दि.

31/03/2019 पर्यंत वैध असलेले) उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

19. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही 2000/प्र.क्र.17/2000/12, दि.28/03/2005 व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही 2000/प्र.क्र.17/2000/12 दि. 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 अन्वये दि. 28/03/2005 रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्ये बाबत लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारानेही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.
20. लेखी परिक्षेत मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारास, पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील. तोंडी परिक्षेत अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतिम निवडीस अपात्र ठरेल. मात्र एखाद्या उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा उमेदवार पोलीस पाटील पदावरील निवडीकरिता पात्र राहील.
21. समान गुण मिळाल्यासअंतिम निवड :- शासन निर्णय क्रमांक बीव्हीपी 1113/1767/प्र.क्र. 592/पोल-8 दि. 22/08/2014 अन्वये, गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना **समान गुण** मिळाल्यास खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

    1. पोलिस पाटलांचे वारस; त्यानंतर
    2. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर,
    3. माजी सैनिक असलेले उमेदवारत्यानंतर,
    4. वयाने ज्येष्ठ असलेले उमेदवार

    #पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि त्यांची दोन मुले यांचा समावेश राहिल. त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नातेवाईकाचा वारस म्हणून विचार करता येणार नाही.
22. याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय, परिपत्रकांतील नेमणूकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटीसुद्धा बंधनकारक असतील.

## ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत

1. प्रस्तुत पदांकरीता फक्त www.jalgaonexam.com या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी. व मोबाईल क्रमांक चूकिचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहीती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी. व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, एरंडोल भाग हे जबाबदार असणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
2. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.jalgaonexam.com या वेबसाईटद्वारे दि. 05/05/2018 ते दि. 16/05/2018 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
3. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची

पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

4. उमेदवाराची लेखीपरीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखीपरिक्षेच्या प्राथमिक चाळणी/तोंडीपरीक्षेनुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार उपविभागीय दंडाधिकारी, एरंडोल भाग यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.
5. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना www.jalgaonexam.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक 17/05/2018 असा राहील. अंतिम दिनांका नंतर बँकेत परीक्षा शुल्क भरणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.
6. संकेतस्थळावर, ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतरच्या पुढील कार्यालयीन दिवशी खालीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने प्रकिया शुल्क भरता येईल.

- स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) च्या कोणत्याही शाखेत रोखीने चलनाद्वारे किंवा **SBI Collect** द्वारे नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड वापरुन ऑनलाईन पद्धतीने.

संकेतस्थळावरुन प्राप्त होणा-या चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फत चलनात नमूद असलेली आवश्यक ते प्रक्रिया शुल्क स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरता येईल. सदरच्या 3 प्रतींपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, एरंडोल प्रत स्टेट बँक ऑफ इंडिया कडून परत मिळेल. त्यापैकी उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, एरंडोल प्रत, उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी / मुलाखत घेतली जाणार नाही.

नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड द्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरण्याच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास Payment Receipt जतन करुन ठेवा.

बँकेत प्रक्रिया शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक दि. 17/05/2018 पर्यंत आहे.

प्रक्रिया शुल्क भरण्याच्या अंतिम दिनांका नंतर प्रक्रिया शुल्क भरणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

<u>ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची खात्री करुन घ्यावी. प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड वापरुन होणा-या व्यवहारांची जबाबदारी संपुर्णतः उमेदवाराची आहे व उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, एरंडोल यास जबाबदार असणार नाही.</u>

7. वरीलपैकी कोणत्याही पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दोन (2) दिवसानंतर www.jalgaonexam.com या संकेतस्थळावर लॉग इन करुन उमेदवाराला प्रक्रिया शुल्क नोंदीची स्थिती तपासता येईल. तसेच अर्जाची प्रिंट काढता येईल.
8. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो व सही स्कॅन करुन www.jalgaonexam.com संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहित पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.
9. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळेनंतर संकेतस्थळा वरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.
10. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/परिक्षाकेंद्र/बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहितीवर दिलेल्या (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणारनाही. सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरतीप्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
11. ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षाशुल्क भरणे आवश्यक राहिल. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.
12. माजीसैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावे लागेल.
13. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्या साठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्ववि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्गआणि इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वर्ष 2018-19 या कालावधी करिता वैध असलेले (अद्ययावत अर्थात 31/03/2019 पर्यत वैध असलेले) (नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
14. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे अनिवार्य आहे. शासननिर्णय महिला व बालकल्याणक्र.82/2001/म.से.आ-2000/प्र.क्र.415/का.2, दि.25/05/2001 मधील तरतूदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहिल. या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष 2018-19 या कालावधी करिता वैध असलेले (अद्ययावत अर्थात 31/03/2019 पर्यत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
15. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 28 मार्च 2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 01 जुलै 2005 नुसार विहित केलेल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवाप्रवेशा साठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र बंधनकारक आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
16. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

17. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी /नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल
18. अपात्र अर्जदारांस स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.
19. परीक्षेस/कागदपत्र पडताळणीस/मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
20. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

**प्रक्रिया शुल्कः-**

खालीलप्रमाणे शुल्क भरावे लागेल.

खुला प्रवर्ग - रु. 500 /- मागास प्रवर्ग - रु. 300/-

**(वर दर्शविण्यात आलेले प्रक्रिया शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)**

**टिपः -** चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या शाखेत प्रक्रिया शुल्क भरल्यास रु. 40/- इतके सेवा शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

**SBI Collect** द्वारे नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड द्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते बँकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.

ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची संपुर्ण खात्री करुन घ्यावी. प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड वापरुन होणा-या व्यवहारांची जबाबदारी संपुर्णतः उमेदवाराची आहे व उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, एरंडोल यास जबाबदार असणार नाही.

**रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे**

| अ.क्र | भरती प्रकिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1 | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक 05/05/2018 (सकाळी 12.00 पासून) ते दिनांक 16/05/2018 (सायंकाळी 05.30 पर्यंत) |
| 2 | बँकेत रोखीने किंवा ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक 17/05/2018 |

**विशेष सूचना:-**

- या पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही, तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत.
- अर्जदारांना अर्ज भरण्या संदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी 9112721897 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

दिनांक :- 04/05/2018

**उपविभागीय दंडाधिकारी, एरंडोल भाग**
**जिल्हा जळगाव**